Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
Vol - V Issue-XII DECEMBER 2018 ISSN 2349-638x Impact Factor 4.574

# *गडचिरोली जिल्हयातील* शालेय पोषण आहार योजना राबवितांना शालेय व्यवस्थापनात येणाऱ्या समस्यांचा विश्लेषणात्मक अभ्यास

**प्रकाश रामदास महाकाळकर**
एम.ए. (इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र)
एम,एड. सेट (शिक्षणशास्त्र)

**प्रस्तावना**

प्रस्तुत संशोधन हे उच्चप्राथमिक शाळेत दिल्याजाणाऱ्या शालेय पोषण आहाराशी संबंधित आहे . उच्चप्राथमिकस्तरावरील विदयार्थ्याचे शिक्षण व त्याशिक्षणाची कार्यपध्दती , उच्चप्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण व त्यात येणाऱ्या योजनांद्वारे विदयार्थ्यांना होणारे फायदे व योजनेसंबंधी उपाययोजना यासर्वबाबींना केंद्रभूत करून सदर संशोधन करण्यात आलेले आहे.

**संशोधन उदिदष्टये :-**

१. शालेय पोषण आहार योजने अंतर्गत आपत्तीव्यवस्थापन सुविधेचा अभ्यास करणे .
२. शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत सुरक्षितता व स्वच्छता संदर्भात दक्षता घेणेबाबत उपाययोजना सुचविणे.
३. शालेय पोषण आहार योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शाळेतील व्यवस्थापन समितीच्या भूमिकेचे अध्ययन करणे.
४. मुख्याध्यापक तथा सचिव, शाळाव्यवस्थापन समिती यांना शालेयपोषणआहार योजना राबवितांना येणा -या समस्यांचा अभ्यास करणे.
५. शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत विदयार्थ्याच्या उपस्थितीवर होणा-या परिणामांचे अध्ययन करणे.

**संशोधनाची गृहितके :-**

१. शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत आपत्ती व्यवस्थापन सुविधेच्या समस्या उदभवतात.
२. शालेय पोषण आहार योजना अंमलबजावणी करतांना सुरक्षितता व स्वच्छता संदर्भात दक्षता घेतल्या जाते
३. शालेय पोषण आहार योजना राबवितांना येणा -या समस्यांची पुर्तता करण्यासाठी शाळाव्यवस्थापन समितीची भूमिका महत्वाची ठरते.
४. मुख्याध्यापक तथा सचिव शाळाव्यवस्थापन समिती यांना शालेय पोषण आहार योजने अंतर्गत समस्या उदभवातात.
५. शालेय पोषण आहार योजनेची अंमलबजावणी करतांना विदयार्थ्याच्या उपस्थितीवर सकारात्मक परिणाम होतो.

**संशोधनाचे महत्व :-** उच्चप्राथमिकस्तरावर इयत्ता ६वी ते ८वी शालेय पोषण आहारयोजनेची अंमलबजावणी होत असतांना कोणकोणत्या समस्या निर्माण होतात . या समस्यांचा शोध घेउन त्यामागील कारणे शोधून त्यावर उपाययोजना सुचवितायेतील या कारणाने प्रस्तुत संशोधन होणे महत्वाचे ठरते.

**संशोधनाची आवश्यकता :-** शाळेत दिलाजाणारा शालेय पोषण आहार योग्य मिळतो किंवा त्यातकाही अडचणी येतात. हे संशोधकाला याअभ्यासातून कळेल म्हणून प्र स्तुत विषयाची संशोधनासाठी निवड केली. शालेय पोषण आहार योजना १९९५ मध्ये अस्तित्वात आली . इतर विषयात ज्याप्रमाणात संशोधने झालेली आहेत . तुलनात्मकदृष्ट्या प्रस्तुत विषयावर संशोधनाचेप्रमाण अल्पस्वरूपाचे आहे . झालेली संशोधनेही फक्त प्राथमिक इयत्ता १ली ते ५वी स्तरावरील असल्याचे निदर्शनास येते . प्राथमिकस्तरासोबतच उच्चप्राथमिक इयता ६वी ते ८वी स्तरालाही प्रस्तुत योजना टप्प्याटप्प्याने लागु केलेली आहे व उच्चप्राथमिक स्तरहा अत्यंत महत्वपुर्ण असलेला गट आहे . ज्यामध्ये सामान्यपणे १० ते १४ वयोगटातील मलामुलींचा प्रामुख्याने समावेश होतो म्हणून संशोधकानेही एक ज्वलंत समस्या समजून त्यावर संशोधन करण्याचे ठरविले.

**संशोधनाची व्याप्ती :-** गडचिरोली जिल्हयातील ग्रामीण भागातील शालेयपोषण आहार योजना राबविणाऱ्या स्थानिक स्वराज्यसंस्थेच्या जिल्हापरिषद उच्च प्राथमिक शाळांचा समावेश करण्यात

**संशोधनाची मर्यादा :-**

१. संशोधकाचे संशोधनहे केवळ गडचिरोली, जिल्हयापुरते मर्यादित आहे

२. सदरचे संशोधनहे उच्चप्राथमिकसतर इयता ६वी ते ८वी करीताच मर्यादित आहे.

३. प्रस्तुत संशोधनात उच्चप्राथमिकस्तरांच्या मुले व मुलीचा समावेश करण्यात आला.

**संशोधनाची कार्यपध्दती**

प्रस्तुतसंशोधनात सर्वेक्षणपध्दतीचा वापर केला होता . त्याची कार्यपध्दती पुढीलप्रमाणे केली . प्रस्तुत संशोधन सर्वेक्षण पध्दतीने केले असून प्रासंगिक नमुनानिवडपध्दतीने नमुना निवडला आहे. संशोधन खालील पायऱ्यानुसार केले.

१. मुख्याध्यापक, शिक्षक, विदयार्थी व आहारविषयक कामकरणाऱ्या कर्मचाऱ्यासाठी प्रश्नावली तयार केली.
२. माहिती संकलन केले.
३. विश्लेषण केले.
४. अहवाल तयार केला.

**जनसंख्या व नमुनानिवड**

| अ.क्र | जिल्हा | मुख्याध्यापक | कर्मचारी | शिक्षक | विदयार्थी |
|---|---|---|---|---|---|
| १ | गडचिरोली | ५० | ५० | ५० | १०० |

**निष्कर्ष :-**

१. शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत आपत्ती व्यवस्थापन सुविधा अंगिकारली जाते.
२. सुरक्षितता व स्वच्छता संदर्भात काळजी घेतली जातनाही धान्य साठवणुकीसाठी कोटयांचा वापर आवश्यक.
३. शापोआ अंमलबजावणीसाठी शाळाव्यवस्थापन समितीची भूमिका महत्वपूर्ण ठरते.
४. शापोआ अंतर्गत विदयार्थ्यांच्या उपस्थितवर सकारात्मक परीणाम जाणवतो. गळती कमी झालेली आहे.

**शालेय पोषण आहार योजनेमधील अडचणीवर उपाययोजना**

१. शाळाव्यवस्थापन समितीचा सक्रीय सहभागाबाबत तरतुद करावी.

२. मुख्याध्यापकांनी व शिक्षकांनी पालकांना चव घेण्याची गरज , महत्व व धोके पटवूनदयावेत त्यासाठी विविध उपाय राबवावेत.

३. गृहभेटीसाठी शिक्षकांच्या मदतीने कार्यक्रम आखून पालकांना आहाराचे महत्व पटवूनदयावे सभाअहवालांना अवास्त्व महत्व असू नये .

४. पुरकआहारासाठीच्या रकमेत भरीव वाढ करावी.

**शिफारसी**

❖ **मुख्याध्यापक :**

१. गावातील युवक मंडळाच्या सदस्यांचे सहकार्य घ्यावे.

२. शालेय पोषण आहार योजनेचे रजिस्टर भरणे, सरासरी काढणे, तांदूळसाठा नोंदवणे बिले तयार करणे इ. कामाचे सहकाऱ्याच्या सहाय्याने योग्य नियोजनकरून कामाची विभागणी करावी.

३. शालेय व सहशालेय उपक्रमामध्ये सहभोजन , संघभावना कामातील आनंद स्वयंशिस्त सहकार्य इ . चे आयोजन करावे.

❖ **कामकरणारे कर्मचारी :**

१. विदयार्थ्यांना आहार स्वच्छता गरम देण्याचा प्रयत्न करावा.

२. शालेय पोषण आहार शिजवितांना मुख्याध्यापक, शिक्षक, विदयार्थीयांनी केलेल्या सूचनांचे पालन करून धोका विरहीत आहार देण्यात यावा.

३. शालेयपोषण आहार योजनेसाठी पाणी स्वच्छ व शुध्द वापरावे.

❖ **शिक्षक :**

१. शालेय पोषण आहार योजनेची पूर्वतयारी अध्यापनकार्याच्या अगोदर करावी.

२. अध्यापनाचा वेळ वाया जावूनये म्हणुन अध्यापनाची पूर्वतयारी , टाचणे, शैक्षणिक साधने उपक्रमाचे नियोजन योग्यपध्दतीनेकरून वर्गाचा वेळ वाया जाणार नाही याची काळली घ्यावी.

**संदर्भ ग्रंथसूची**

१. **चौधरी महेंद्र काशिनाथ (२००७)** यांनी जळगांव जिल्हयाच्या चोपडा तालुक्यातील चऱ्हाडी गावातील प्राथमिक शाळेत राबविल्या जाणाऱ्या शालेय पोषण आहार उपक्रमाचा अभ्यास एम. एड पुणे विदयापीठ.

२. **चौधरी एस. टी. (२००५)** यांनी शालेय पोषण आहार यायोजनेचा अभ्यास या विषयावर संशोधन केले होते . एम. एड पुणे विदयापीठ.

३. **नीपा (१९७९)** “National Institute of Planning and Administration” नवी दिल्ली . यांनी “आंधप्रदेशातील प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरण संबंधात प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनाचा अभ्यास करणे.” www.yahoonews.com १० फेबुरवारी २००७.

४. **पुरदंरे वैशाली बाळकृष्ण (१९८६)**यांनी ठाणे जिल्हयातील आश्रमशाळांच्या समस्या . पीएच. डी. मुंबई विदयापीठ.